13 JAN 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# वि.स.खांडेकर यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, रवी लोंढे, डॉ. दत्तात्रय मचाले, श्रीराम सुतार, तबस्सुम पठाण, डॉ. उदयसिंह राजेयादव, नितीन गंगधर, ऐश्वर्या मुरटे, वैशाली महाडिक आदी उपस्थित होते.

12 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आव्हाने स्वीकारून करिअर घडवा

## कुलगुरू डॉ. शिर्के : 'सकाळ'चे वरिष्ठ बातमीदार संतोष मिठारींचा गौरव

■ सकाळ वृत्तसेवा



अतिग्रे : कोल्हापूर डिस्ट्रिक्ट रिपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशनच्या पुरस्कार वितरण प्रसंगी उपस्थित शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव, ताज मुलाणी, सुधाकर निर्मळे व पुरस्कार प्राप्त पत्रकार.

हातकणंगले, ता. १२ : "आव्हानांची चिंता करू नका. नवी आव्हान स्वीकारून आपले कर्तृत्व दाखवा व करिअर घडवा. जागतिकीकरणामुळे आपण आपले राहिलो नाही, याचे भान ठेवून सावध पाऊल टाकायला हवे. एखाद्या विषयावर बातमी देताना दूरगामी परिणामांचा विचार करून सर्वांगाने विचार करून ती द्यावी. बातमीची दुसरी बाजूही मांडता आली पाहिजे," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट रिपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशनतर्फे आयोजित पत्रकार पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव अध्यक्षस्थानी होते. घोडावत इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. विराट गिरी, ताज मुलाणी व अध्यक्ष सुधाकर निर्मळे उपस्थित होते. अतिग्रे येथील संजय घोडावत विद्यापीठात कार्यक्रम झाला.

ते म्हणाले, "एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता येथून पुढे महत्त्वाची आहे याची जाणीवही असू द्या. पत्रकारितेमध्ये वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ या तिन्ही काळांविषयी दिशादर्शन करण्यात तुमचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी भोवताली घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे अवधान पत्रकारांनी ठेवावे."

निखिल पंडितराव म्हणाले, "सोशल मीडियापेक्षा प्रिंट मीडियावर लोकांचा विश्वास आहे. ही विश्वासार्हता जपण्यासाठी आपण जागरूकतेने कार्य केले पाहिजे. पत्रकार हे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जाऊन पत्रकारिता करतात. अशा पत्रकारांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. पुरस्काराने जबाबदारी वाढते. तंत्रज्ञान हे प्रिंट मीडियाला अतिशय पोषक आहे. काळाबरोबर आपण तंत्रज्ञान शिकून खमकी पत्रकारिता केली पाहिजे. सोशल मीडियाची माहिती खरी आहे की, खोटी आहे, हे तपासण्याची यंत्रणा उभी करावी लागते; पण प्रिंट मीडियाबाबत तसे होत नाही. आपली लेखणी ही सत्याच्या बाजूने असली पाहिजे. बातमीदार हा कोणत्याही गटा-तटाचा किंवा पक्षाचा नसतो, तर तो आपल्या बातमीशी बांधील असतो."

घोडावत इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. विराट गिरी, ताज मुल्लानी यांनी मनोगत व्यक्त केले. 'सकाळ'चे वरिष्ठ बातमीदार संतोष मिठारी यांना उत्कृष्ट पत्रकार, गुरुबाळ माळी यांना जीवनगौरव, 'सकाळ'चे बातमीदार संभाजी निकम यांच्यासह अशोक पाटील, ज्ञानेश्वर साळुंखे, धनाजी गुरव, दीपक ऐतवडे, शिवाजी भोरे, यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

तसेच जिल्ह्यातील बारा तालुके व सीमा भागातील १९ पत्रकारांना गौरवले. यावेळी 'जागल्या' या स्मरणिकेचे व निबंधायन या पुस्तकाचे प्रकाशन झाले. सदानंद कुलकर्णी, दगडू माने, भास्कर चंदनशिवे, निवास वरपे, प्रकाश तिराळे, आदी उपस्थित होते. प्रा. रवींद्र पाटील यांनी स्वागत केले. अध्यक्ष सुधाकर निर्मळे यांनी प्रास्ताविक केले. सचिव सुरेश पाटील यांनी अहवाल वाचन केले. पूनम चौगुले व अतुल मंडपे यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष अभिजित कुलकर्णी यांनी आभार मानले.

13 JAN 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मारुतराव कातवरे यांचे कार्य प्रेरणादायी

## सतेज पाटील : कला महाविद्यालयासाठी शिवाजी विद्यापीठाने पुढाकार घ्यावा



शाहू स्मारक भवनात रविवारी मारुतराव कातवरे आणि मंगला कातवरे यांचा मानपत्र देऊन आमदार सतेज पाटील आणि कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सतीश कुंभार, दिलीप पवार, प्रकाश कुंभार, आर. के. पोवार, समरजित घाटगे, व्ही. बी. पाटील, ॲड. महादेवराव आडगुळे, सतीश दरेकर उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कुंभार समाजासोबत कोल्हापूरच्या जडणघडणीत हातभार लावणाऱ्या मारुतराव कातवरे यांच्यासारख्या कर्तृत्ववान कार्यकर्त्यांचे योगदान पुढील पिढीला प्रेरणादायी आहे, त्यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या कलामंदिर या कला महाविद्यालयासाठी जागा आणि अनुदान मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन माजी गृहराज्यमंत्री आणि कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आमदार सतेज पाटील यांनी दिले.

राजर्षी शाहू स्मारक भवन येथे रविवारी माजी महापौर मारुतराव कातवरे यांच्या ७५ व्या नागरी सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सतेज पाटील यांच्या हस्ते मारुतराव कातवरे आणि मंगल कातवरे यांचा सत्कार करून मानपत्र देण्यात आले. शाहू कारखान्याचे चेअरमन समरजित घाटगे यांच्या हस्ते अमृतकलश गौरवांकाचे प्रकाशन करण्यात आले.

सतेज पाटील म्हणाले, कातवरे यांनी कोल्हापुरातील प्रश्नांसाठी सातत्याने धडपड केली. त्यांचे कर्तृत्व आणि योगदान विशेष प्रेरणा देणारे आहे. कला महाविद्यालयाचा प्रश्न आणि प्लॅस्टर ऑफ पॅरिसवरील बंदीमुळे कुंभार समाजाला येणाऱ्या अडचणींवरही तोडगा काढू, असे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, माजी महापौर आर. के. पोवार, ॲड. महादेवराव आडगुळे, दिलीप पवार, कुंभार विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सतीश दरेकर यांची भाषणे झाली. ॲड. अनिल घाटगे यांनी सूत्रसंचालन केले.

### आठवणी सांगताना कातवरे गहिवरले

माझ्या शब्दासाठी तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी महापौर असताना दोन कोटी अनुदान दिले. कुंभार समाज अडचणीत असताना सतेज पाटील यांनी दोन तासात शासन आदेश काढून पीओपीवरील बंदी उठवली. मी आजारी असताना कुंभार समाजाच्या मोर्चाचे नेतृत्व सदाशिवराव मंडलिक यांनी केले, अशा अनेक आठवणी सांगताना कातवरे गहिवरले.